

श्री गजानन महाराज, शेगांव.

गण गण गणात बोते

- जय गजानन -

# श्री सद्गुरु गजानन महाराज प्रार्थनाष्टक

(वृत्त शार्दूलविक्रीडित)

१) ॐ कारा, परतत्त्व, निर्गुणा, चिदानंदा, सदा पावना ॥
आनंदामृत सागरा, परतरा, देशी जना जीवना ॥
द्याया भक्तजना सुबोध, करिशी आनंदि नवजीवन ॥
शेगांवी गुरु श्री गजानन पदी माझे सदा वंदन ॥१॥

२) बाल्यीं लोकविलक्षण कृतिमुळे, स्वानंद सिंहासनी ॥
खाई ते वसलेहि, दावि न लगे सुस्वाद तो भोजनी ॥
कोठेही असणे, कसेहि बसणे, योगीन्द्र हा चिद्घन ॥
शेगांवीं गुरु श्रीगजानन पदीं, माझे सदा वंदन ॥२॥

३) अग्नी मित्र बनूनि, आसनि बसे, हे योगियां दुर्लभ ॥
पर्जन्या निज शक्तिने स्थिरवुनी, दावी रखुठे ते नभ ॥
तेजा लाजवि, भूमि पावन करी, हे पंचभूतावन ॥
शेगांवीं, गुरु श्रीगजानन पदीं माझे सदा वंदन ॥३॥

४) सद्बोधा "गण" घेऊनी "गण" वरे, ठेवी मनीं शुध्दता ॥
आहे तत्त्व "गणांत" देव असतो, "बोते" करी सिध्दता ॥
वाचासिध्द, युगावतार दिसतां आनंदि होते मन ॥
शेगावीं गुरु श्रीगजानन पदीं माझे सदा वंदन ॥४॥

५) ऐसा सद्गुरु हा समर्थ, जननी ज्या अन्नपूर्णा म्हणे ॥
मी येथे जन-भोजना पुरवितां, धान्या पडेना उणे ॥
ज्याचे दर्शन लोकपावन असे, जो तोडितो बंधन ॥
शेगावीं गुरु श्रीगजानन पदी, माझे सदा वंदन ॥५॥

६) भक्तांचे वारे ठेवी पूर्ण करुणा, सांभाळि रात्रंदिन ॥
श्रध्देने, करितां तरेल कुणीही यश्नामसंकीर्तन ॥
भेदातीत, करीत ऐक्य, हरवी शंका, असाधारण ॥
शेगांवी गुरु श्रीगजानन पदीं माझे सदा वंदन ॥६॥

७) चिन्मात्रास्थितिने समाधीत बसे, श्रीराम घेई शिरीं ॥
लीनत्वे मिळतो स्वयं हि भगवान्, कोठेहि हातीं धरी ॥
मुक्तिचा सहजस्थिति प्रकट ये, ते धन्य हो जीवन ॥
शेगावीं गुरु श्रीगजानन पदी, माझे सदा वंदन ॥७॥

८) हे श्रीमन् गुरुराज पादकमलीं माझी असे प्रार्थना ॥
द्यावे दर्शन शीघ्र, शांतवि मना, ही मात्र अभ्यर्थना ॥
ठेवा मस्तकि हस्त तो वरदसा, द्यावेच संजीवन ॥
शेगावी गुरु श्रीगजानन पदीं माझे सदा वंदन ॥८॥



दि. २४/४/८८ गुरु.
आबाजी पणशीकर
लेस्टर - इंग्लंड

पंडित आबाजी पणशीकर लिखीत हे प्रासादिक स्तोत्र संत गजानन महाराज प्रगट दिन (शेगाव) च्या निमीत्ताने आपले वर्तमानपत्रात प्रसिध्द करावे त्यामुळे महाराजांचे भक्त गणांना आनंद होईल. आ. नम्र - [illegible]

PANDIT ABAJI PANSHIKAR 6 ROMWAY ROAD LEICESTER · LE5 5SA · U.K. TEL:- (0533) 739456